महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
कस्तुरी इमारत, तळमजला, ज. टाटा मार्ग,
पेट्रोलियम हाऊसच्या समोर, चर्चगेट, मुंबई- ४०००२०

दुरध्वनी क्रमांक:-०२२-२२८८०१०६ E-Mail: aao.hrms@mahakosh.in

संदर्भ :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५.
२. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३,दि.२०.०७.२००१.
३. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३,दि.११.०१.२००२.
४. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३,दि.३१.०८.२००९
५. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३,दि.०१.०४.२०१०.
६. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०१.०७.२०११.
७. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३,दि.१९.०१.२०१३.
८. शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र. वेपुर-१२१३/प्र.क्र.४७/सुधारणा-६४ सेवा-९,दि.०४.१२.२०१३
९. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेपुर -१२१२/प्र.क्र.३१/सेवा-९,दि.११.०२.२०१३.
१०. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३ दि.२३.१२.२०१५
११. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०९.१२.२०१६
१२. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.०८/सेवा-३ दि.११.०५.२०१७
१३. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र. वेतन १११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३,दि.०२.०३.२०१९.
१४.शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-१११९/प्र.क्र.०३/२०१९/सेवा-३ दि.०७.१०.२०२२.

क्र.संलेको /०८-२०२४/प्रशा-राप-सलेअ/क.ले./न.क्र.१२९(२०२४) सुआप्रयो/ 775 दि:- 13 NOV 2024

## -: आदेश :-

**विषय** :- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप) संवर्गातील सहायक लेखा अधिकाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला/दुसरा /तिसरा लाभ लागू करणेबाबत.

उपरोक्त संदर्भ क्र.१३ वरील शासन वित्त विभागाच्या दिनांक ०२ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वे सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचारी / अधिकाऱ्यांना १०,२० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि.०१.०१.२०१६ पासून लागु करण्यात आली आहे.

उपरोक्त शासन तरतुदीनुसार तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु. १५,६००-३९,१०० व ग्रेड पे ५,४०० या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी /अधिकारी यांना लागू राहील. संबंधीत कर्मचारी / अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरीत करु लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.त्या अनुषंगाने( सहाव्या वेतन आयोगातील पे बँड ९,३००-३४,८०० ग्रेड पे ४,४००) सातव्या वेतन आयोगातील स्तर एस-१५ (वेतन संरचना रू.४१,८००-१,३२,३००) या वेतन संरचनेतील कर्मचारी /अधिकाऱ्यांना लागू राहील.

वित्त विभागाच्या दि.०२ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये, १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर पहिला लाभ अनुज्ञेय करण्याची तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप ) संवर्गात सरळ सेवेने नियुक्ती करण्यांत आलेल्या सहायक लेखा अधिकाऱ्यांची १० वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेनंतर त्यांना सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला/दुसरा/तिसरा लाभ अनुज्ञेय आहे. त्यानुसार संचालनालयाच्या अधिनस्त सहायक लेखा अधिकारी गट-ब (राप) संवर्गातील अधिकाऱ्यांना सातवा वेतन आयोगातील पे मॅट्रिक स्तर एस-१५(वेतन संरचना रू.४१,८००-१,३२,३००) या वेतन संरचनेत वेतन घेणा-या खालील नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या पदोन्नतीच्या साखळीत लेखा अधिकारी या संवर्गातील पदाचा पे मॅट्रिक स्तर एस-१६ (वेतन संरचना रू.४४,९००-१,४२,४००) या वेतन संरचनेमध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या स्तंभ ४ मध्ये नमूद दिनांकापासून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लाभ मंजूर करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट ब (राप) संवर्गातील ८० % कोटयातील सहायक लेखा अधिकाऱ्यांना १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर सुधारित आश्वासित प्रगती योजना अंतर्गत वरिष्ठ (लेखा अधिकारी ) वेतन श्रेणीचा पहिला लाभ .**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप.) सलेअ संवर्गातील पदस्थापनेचा दिनांक. | सुधारित आ.प्र.यो. अंतर्गत पहिला लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. संजय गोकुलसिंह पवार,<br>लेखा अधिकारी. | ०५-०७-२०१३ | ०५-०७-२०२३ |
| २ | श्रीम. अनिता सुभाष जमणे,<br>लेखा अधिकारी. | २८-०८-२००८ | २८-०८-२०१८ |
| ३ | श्री. विपीन शिवराम फटिंग,<br>सहाय्यक लेखा अधिकारी. | १५-०३-२००८ | १५-०३-२०१८ |

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट ब (राप) संवर्गातील ८० % कोटयातील कार्यरत सहायक लेखा अधिकाऱ्यांना १०/२० वर्षाच्या नियमित सेवेनंतर सुधारित आश्वासित प्रगती योजना अंतर्गत वरिष्ठ (लेखा अधिकारी ) वेतन श्रेणीचा दुसरा लाभ .**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप.) सलेअ संवर्गातील पदस्थापनेचा दिनांक. | सुधारित आ.प्र.यो. अंतर्गत दुसरा लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.राजेश दिगंबर जोशी,<br>लेखा अधिकारी. | ०१-११-२०१३ | ०१-११-२०२३ |
| २. | श्री.मनोहर रामजी ढेंगळे,<br>लेखा अधिकारी. | १९-०६-२०१३ | १९-०६-२०२३ |
| ३. | श्री.सतीश मारुती लहाने,<br>लेखा अधिकारी. | ०१-०७-२०१० | ०१-०७-२०२० |

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट ब (राप) संवर्गातील २० % कोटयातील कार्यरत /सेवानिवृत्त सहायक लेखा अधिकाऱ्यांना सुधारित आश्वासित प्रगती योजना अंतर्गत वरिष्ठ (लेखा अधिकारी ) वेतन श्रेणीचा पहिला लाभ .

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव, पदनाम | शासकीय सेवेतील नियुक्तीचा दिनांक | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप.) सलेअ संवर्गातील पदस्थापनेचा दिनांक. | आ.प्र.यो. अंतर्गत मंजूर लाभ/ पदोन्नतीचा दिनांक व पदनाम. | सुधारित आ.प्र.यो. अंतर्गत पहिला लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.रमेश राजेश्वर कावळे, लेखा अधिकारी | १७-०२-१९९५ कनिष्ठ लेखा परीक्षक | २५-०९-२०१३ | १६-१०-२००३ जि.ग्रा.पं.ले.प. श्रेणी -२ (पहिली पदोन्नती)<br>२५-०९-२०१३ सहायक लेखा अधिकारी (दुसरी पदोन्नती) | २५-०९-२०२३ |
| २ | श्री.इंदल रतन चव्हाण सेवानिवृत्त सहायक लेखा अधिकारी. (से.नि.दि.२९.०२.२०२४) | १७-०७-१९९६ दुय्यम ग्रामपंचायत लेखा परीक्षक | ०३-०४-२०१३ | २०-०६-२००१ वरिष्ठ लेखा परीक्षक (पहिली पदोन्नती)<br>०३-०४-२०१३ सहायक लेखा परीक्षा अधिकारी (दुसरी पदोन्नती) | ०३-०४-२०२३ |
| ३ | श्री. विनोद मधूकर ढोमणे, लेखा अधिकारी. | १७-०२-१९९५ कनिष्ठ लेखा परीक्षक | २४-०९-२०१३ | ०१-१०-२००३ जि.ग्रा.पं.ले.प. श्रेणी-२ (पहिली पदोन्नती)<br>२४-०९-२०१३ सहायक लेखा परीक्षा अधिकारी (दुसरी पदोन्नती) | २४-०९-२०२३ |
| ४ | श्री.प्रशांत विष्णुपंत देशपांडे, लेखा अधिकारी. | २०-०२-१९९५ कनिष्ठ लेखा परीक्षक | २६-०९-२०१३ | ०३-१०-२००३ जि.ग्रा.पं.ले.प. श्रेणी-२ (पहिली पदोन्नती)<br>२६-०९-२०१३ सहायक लेखा अधिकारी (दुसरी पदोन्नती) | २६-०९-२०२३ |

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट ब (राप) संवर्गातील २० % कोटयातील कार्यरत /सेवानिवृत्त सहायक लेखा अधिकाऱ्यांना सुधारित आश्वासित प्रगती योजना अंतर्गत वरिष्ठ (लेखा अधिकारी ) वेतन श्रेणीचा तिसरा लाभ .**

| अ. क्र | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | शासकीय सेवेतील नियुक्तीचा दिनांक | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप.) सलेअ संवर्गातील पदस्थापनेचा दिनांक. | आ.प्र.यो अंतर्गत मिळालेल्या पदोन्नती/लाभाचा दिनांक व पदनाम. | से.आ.प्र.यो.अंतर्गत तिसरा लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.सुनिल हिंदुराव मिसाळ, सहायक लेखा अधिकारी. | ०९-१२-१९९३ संयत्र चालक पशुसंवर्धन, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, सोलापूर. १९-१०-२००५ समायोजनाने, (टिप्पणी सहाय्यक) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई. | २५-०९-२०१३ | ०९-१२-२००५ सहाय्यक अधिक्षक (पहिला लाभ)<br>०९-१२-२०१३ (प्रत्यक्ष देय ०१-०१-२०१६) सहायक लेखा अधिकारी (दुसरा लाभ) | ०९-१२-२०२३ |

**अटी व शर्ती-:**

१. सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभामुळे संबंधित अधिकारी वर्गाच्या जबाबदारी आणि कर्तव्यामध्ये वाढ होत नसली तरी त्यांना संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदीच्या अधीन राहून नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. या योजने अंतर्गत वरीष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतन निश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल मात्र त्याच वेतन संरचनेत नियमित/कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२. कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी /अधिकारी यास भविष्यात होणाऱ्या /झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत,कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर,अन्य विहित अटी व शर्तीच्या पुर्ततेनंतर,या योजनेअंतर्गत यथास्थिती पहिला/दुसरा/तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

३. या योजनेंतर्गत पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधिताची वेतननिश्चिती ही त्यांना जणु काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून,महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ मधील नियम १२ च्या तरतूदीनुसार करण्यात येईल.

४. या आदेशान्वये कालबध्द पदोन्नती / सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यांत आलेल्या अधिका-यांनी शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१०८२/सीआर-११००/(एक)/एसईआर-३, दिनांक ०६/११/१९८४ व वित्त विभाग, शासन परिपत्रक वेपूर- २०१९/प्र.क्र.८/सेवा-९ दि.२०/०२/२०१९ नुसार वेतन निश्चितीचा विकल्प दयावयाचा असल्यास तो त्यांनी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत दयावा. व अशा

प्रकारचा विकल्प न दिल्यास त्यांची वेतन निश्चिती म.ना.से (वेतन) नियम १९८१ मधील ११(१)(ए) खालील तरतूदीनुसार करण्यांत येईल. संबंधित कार्यालय प्रमुखांनी वरील अधिका-यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेतील वेतन निश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करून त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक नुसार देण्यांत यावा.

**सदरचे आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त अधिका-यांच्या वेतननिश्चितीसाठी संबंधित कार्यालयप्रमुख यांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरावी.**

13/11/24

**(दीपा देशपांडे)**
संचालक,
लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत सस्नेह अग्रेषित :-

१. सहसंचालक, लेखा व कोषागारे (सर्व)

२. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालये (सर्व)

यांनी संचालनालयाच्या दि.०५/१२/२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार कार्यवाही करून संचालनालयास अहवाल सादर करावा.

प्रत

१. आदेशातील नमूद अधिकाऱ्यांचे विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
२. अधिदान व लेखा अधिकारी,अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
३. संबधित अधिकारी यांची वैयक्तिक नस्ती.
४. निवड नस्ती.